**स्थायी निदेश क्र. २८**

**नगरपरिषद आस्थापनेवर उन्नत वेतन श्रेणीमध्ये पद निर्मितीनंतर नगरपरिषद कर्मचाऱ्यांची पदोन्नती बाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**क्र. नपप्रसं/पदोन्नती /२००५/प्र.क्र१७९/५**
**दिनांक : १७ फेब्रुवारी, २००५**

प्रस्तावना

०१. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ नुसार नगरपरिषदेचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर वेळोवेळी ठरविण्यात आलेले निकष, नगरपरिषदेसाठी विहीत केलेला कर्मचारी आराखडा आणि नगरपरिषदेच्या कामाची व्याप्ती व गरज विचारात घेऊन काही नगरपरिषदेच्या आस्थापनेवर मंजूर असलेले पद उच्च वेतनश्रेणीमध्ये उन्नत करण्यांत येते.

०२. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वेतन) नियम १९८१ नियम ११ नुसार एखादा कर्मचारी नगरपरिषद सेवेत नियुक्त केल्यानंतर त्या पदाची वेतनश्रेणी कर्मचाऱ्यास लागू करण्यांत येते. कर्मचाऱ्याच्या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती दिल्यानंतर बदल होतो. आपोआप उच्च वेतनश्रेणी लागू करता येत नाही. नगरपरिषदेचे पद उच्च वेतनश्रेणीमध्ये उन्नत करण्यांत आल्यानंतर मूळ पदावरील कर्मचाऱ्यास आपोआप उन्नत पदाची वेतनश्रेणी नगरपरिषदेने लागू केली असल्याचे व उन्नत पदाच्या वेतनश्रेणीमध्ये १२ वर्षाचा कालावधी झालेला नसताना कालबध्द वेतनश्रेणी लागू केल्याचे नगरपरिषदांच्या प्रस्तावाची छाननी करत असताना या संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

०३. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६(१) नुसार नगरपरिषदेच्या आस्थापनेवर पदनिर्मितीचे अधिकार तसेच कलम ७६(२) नुसार नगरपरिषद आस्थापनेवर पदांची अर्हता, वेतन भत्ते व सेवेच्या शर्ती तसेच त्यांच्या सेवाप्रवेशाच्या पध्दती विहित करण्याचे अधिकार संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना आहेत. या तरतूदीनुसार उन्नत पदाची वेतनश्रेणी बाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात येत आहे.

आ दे श

०४. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील आढाव्याअंती सुधारीत आकृतीबंधामध्ये उच्च वेतनश्रेणीत कोणत्याही संवर्गातील पद उन्नत करण्यात आले असल्यास मूळ पदावरील कार्यरत कर्मचाऱ्याला आपोआप उन्नत पदाची उच्च वेतनश्रेणी लागू करता येणार नाही. जोपर्यंत उन्नत पदावर पदोन्नतीद्वारे कर्मचाऱ्याची नियुक्ती होत नाही, तोपर्यंत सदर पद मूळच्या वेतनश्रेणीमध्येच तात्पुरत्या स्वरुपात अवनत करुन त्यावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास वेतन अदा करण्यात यावे. या संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशान्वये (संदर्भ:- स्थाई निदेश क्र.२० क्र.नप्रसंई १००३/प्र.क्र.१५०/०३/७, दि. ३१.१२.२००३). नगरपरिषदेने पदोन्नतीबाबत कारवाई केल्यानंतर पदोन्नतीमध्ये पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यास उन्नत पदाची वेतनश्रेणी लागू होईल.

०५. यापूर्वी ज्या नगरपरिषदांच्या आस्थापनेवर उन्नत वेतनश्रेणीमध्ये पद निर्माण करण्यात आलेले आहे त्यानंतर मुळच्या वेतनश्रेणीमधील नगरपरिषद कर्मचाऱ्यांना उन्नत वेतनश्रेणी आपोआप लागू केली असेल तर ती अनियमित पदोन्नती समजण्यात यावी. परंतू त्या कर्मचाऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यावेळी विहीत असलेली पदोन्नतीसाठीची कार्यपध्दती अवलंबून ते कर्मचारी जर जेष्ठता, पात्रता, अर्हता इ.बाबींची पूर्तता करत असतील त्यांना पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवावा. सर्वसाधारण सभेमध्ये उन्नत वेतनश्रेणीतील पदांवर

पदोन्नती देण्याबाबत पूर्वलक्षी प्रभावाने निर्णय घेतल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वेतन) नियम १९८१ नियम ११ नुसार त्या कर्मचाऱ्याची वेतननिश्चितीचे आदेश काढावेत व त्यानुसार सेवा अभिलेख्यातील नोंदी सुधारीत करण्यात याव्यात. ज्या कर्मचाऱ्यांना त्यावेळी विहीत असलेली पदोन्नतीसाठीच्या कार्यपध्दतीनुसार सर्वसाधारण सभेने अपात्र ठरविल्यास त्या कर्मचाऱ्याकडून अतिप्रदानाची रक्कम महाराष्ट्र नगरपरिषद लेखा नियम १९७१ नियम १२६ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ९६ नुसार वसुल करण्यात यावी.

०६. नगरपरिषदेने कर्मचाऱ्यास उन्नत वेतनश्रेणी लागू केली असेल तर ती पदोन्नती समजणे आवश्यक आहे. अशी पदोन्नती न समजता जर कालबध्द पदोन्नती लागू केली तर ती चुकीची आहे. कालबध्द पदोन्नतीबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे (संदर्भ :- या संचालनालयाचे पत्र क्र.एमसीपी १०९७/प्र.क्र.८४/९७/५, दि. १७ जुलै १९९७) पालन करुन कालबध्द पदोन्नतीचे आदेश काढावेत व त्यानुसार अपात्र कर्मचाऱ्यांकडून अतिप्रदानाची रक्कम उपरोक्त तरतुदीनुसार वसूल करावी.

वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति:

१) मुख्याधिकारी नगरपरिषद, (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व)
३) प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (सर्व)
४) उपमुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा (सर्व)
५) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
६) निवडक नस्ती.